00133

|| ग्रामपंचायत हा लोकशाही चा पाया आहे || || ग्रामपंचायत कर भरणे हे अध्य कर्तव्य ||
|| पर्यावरण संतुलित समृध्द ग्राम योजना राबवा गावचा विकास घडवा ||

# ग्रामपंचायत कार्यालय बाबुर्डी बेंद

## तालुका – नगर, जिल्हा - अहमदनगर


सौ. हिराबाई अशोक चोभे
उपसरपंच

E MAIL – gpbaburdibend@gmail.com

सौ. मंदा सुनिल खेंगट
सरपंच


जा.क्र.

**दिनांक** - 24/ 05 /2023

प्रती,
मा. श्री.निलेशजी लंके साहेब,
विधानसभा सदस्य,
महाराष्ट्र राज्य

**विषय** -: मौजे बाबुर्डी बेंद ता :- नगर येथील विविध विकास कामांना मंजुरी मिळणेबाबत..
**अर्जदार** -: सरपंच,उपसरपंच सदस्य व ग्रामस्थ ग्रामपंचायत बाबुर्डी बेंद ता :- नगर जि :- अहमदनगर

महोदय,

वरील विषयानुसार आपणास विनंती करणेत येते कि, मौजे बाबुर्डी बेंद येथील खालीलप्रमाणे कामे करणे अत्यंत आवश्यक आहे.

1) नगर दौंड रोड ते बाबुर्डी बेंद गावठाण रस्ता मजबुतीकरण व खडीकरण करणे
2) गावठाण ते चिमण वस्ती रस्त्यावर सी डी वर्क करणे
3) गावठाण स्मशानभूमी

वरील प्रमाणे नगर दौंड रोड ते बाबुर्डी बेंद गावठाण हा गावासाठी मुख्य रस्ता असून, रस्त्याची खूपच दुरावस्था झाली आहे. या रस्त्याचा वापर शाळेतील मुले व दुग्ध व्यवसाय करणारे शेतकरी तसेच छोटे मोठे व्यावसायिक करत असतात. अबाल वृद्ध , माता भगिनी सर्वच जन करत असतातसेच सदर रस्ता हा गावचा मुख्य रस्ता असल्याने, रस्त्याचे मजबुतीकरण व खडीकरण करणे अत्यंत आवश्यक आहे.

गावठाण ते चिमण वस्ती रस्त्यावर सी डी वर्क नसल्याने, पावसाळ्यात सदर रस्त्याने जाणे येणे मुश्कील होते. खडकी गावाकडे जाण्यासाठी जवळचा रस्ता असल्याने, शाळेतील मुले व दुग्ध व्यवसाय करणे शेतकरी या रस्त्याचा वापर करतात व नेहमीच या रस्त्याने रहदारी सुद्धा असते. त्यामुळेच गावठाण ते चिमण वस्ती रस्त्यावर सी डी वर्क करणे खूप खूप गरजेचे आहे.

तसेच गावठाण व वाड्या वस्त्यांवर कुठेच गावासाठी स्मशानभूमीची व्यवस्था नसल्याने, एखादी व्यक्ती मयत झाल्यावर खूपच त्रास सहन करावा लागत आहे. खाजगी व वैयक्तिक शेतामध्ये मयत करावी लागत आहे.

तरी वरील मागण्याबाबत आपण विशेष लक्ष घालून, सदरचे काम मंजूर कराल अशी आम्ही अपेक्षा बाळगतो व आपणांस नम्र विनंती करतो.

M.S.K

सरपंच
बाबुर्डी बेंद, ता.जि.अ.नगर